**PRC/PR/41/2025**

# MMRDA Ensures Hassle-Free Ganpati Travel with Extended Timings & Extra Services

## Metro Lines 2A & 7 to Run till Midnight for Ganpati Festival – Special Timetable from 27th August to 6th September 2025 to Cater to Increased Passenger Demand

**Mumbai, 23rd August 2025:**
Under the visionary leadership of Honorable Chief Minister Shri Devendra Fadnavis and Honorable Deputy Chief Minister Shri Eknath Shinde, Chairman of MMRDA, and guided by Dr. Sanjay Mukherjee, Metropolitan Commissioner, MMRDA has announced that the last train services from both terminal stations Andheri West (Line 2A) and Gundavali (Line 7) will now depart at **00:00 hrs** (midnight) instead of **23:00** hrs. This special arrangement will remain effective for 11 days, from 27th August to 6th September 2025, catering to increased passenger demand during the festivities.

This Ganpati season, Mumbaikars can count on the Metro to take them closer to the celebrations. With lakhs of devotees expected to visit pandals across the city, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has introduced extended services on Metro Lines 2A & 7, ensuring safe, smooth, and reliable late-night travel for commuters throughout the festival.

**Train Operations Plan**
**On Weekdays (Monday–Friday):**
- 317 services (12 added to the earlier 305)
- Peak hours: headway of 05:50 minutes
- Non-peak hours: headway of 09:30 minutes

**On Weekends (Saturday):**
- 256 services (12 added to the earlier 244)
- peak hours headway of 08:06 minutes
- Non-peak hours: headway of 10:25 minutes

**On Sundays:**
- 229 services (12 added to the earlier 217)
- flat headway of 10 minutes
- Additional trains to be inducted if required to meet passenger demand

**Commuter Convenience During Ganpati Festival**

These enhanced services have been designed to provide seamless connectivity for lakhs of Mumbaikars visiting pandals and taking part in the festivities. MMRDA remains committed to supporting the city's cultural traditions while enhancing the overall commuter experience through reliable and efficient metro services.

Shri Devendra Fadnavis, Hon'ble Chief Minister of Maharashtra, said:

**"Ganesh Utsav is the soul of Maharashtra, and during these 11 days, millions of devotees travel across Mumbai to celebrate and seek Ganesha's blessings. It is our responsibility to ensure they have safe and reliable transport till midnight. Metro is also a more reliable mode of transport in every weather for devotees. That is why we have decided to extend the last Metro services to Lines 2A and 7 till midnight from 27th August to 6th September. This initiative will not only give devotees more convenience to visit pandals across the city, but also reflects our vision of building a modern, world-class transport system for Mumbai one that is safe, efficient, and truly designed for the people."**

Shri Eknath Shinde, Hon'ble Deputy Chief Minister of Maharashtra and Chairman of MMRDA, stated:

**"Ganesh Utsav is the pride of Maharashtra and holds a special place in the hearts of every Mumbaikar. During these days, lakhs of devotees travel across the city to be part of the celebrations, and it is our duty as a government to make their journey safe, smooth, and comfortable. By extending Metro services till midnight and strengthening operations, MMRDA is ensuring that people can participate in the festivities without worrying about travel. We are committed to preserving cultural traditions and delivering modern, world-class mobility solutions for the citizens of Mumbai"**

Dr. Sanjay Mukherjee, Metropolitan Commissioner, MMRDA Said:

**"Ganesh Utsav is Mumbai's most cherished celebration, with lakhs of devotees travelling late into the night to seek Ganesha's blessings. To support them, Metro Lines 2A and 7 will run till 12 midnight from 27th August to 6th September, instead of the usual 11 pm. During this period, trains will run more frequently during weekday peak hours and with a 10-minute headway on Sundays ensuring safe, reliable, and convenient travel for all. In line with our vision of 'Mumbai in Minutes', this will also allow devotees, including Domestic and International travelers, to reach their favorite pandals in minutes without getting stuck in traffic, making their festive journeys smoother and more joyful."**

Smt. Rubal Agarwal, Managing Director, MMMOCL, said:
**“Ganesh Utsav brings lakhs of people onto the streets, and we want to make sure their travel is smooth and stress-free. That’s why we extended the last train on Metro Lines 2A and 7 till midnight and increased frequencies with trains during peak hours on weekdays and with flat headway of 10 minutes on Sundays. This will help us manage the festive rush better and give citizens a safe, reliable, and convenient option to reach their favorite pandals without getting stuck in traffic.**

---

## गणेशोत्सवातील प्रवास अधिक सुलभ व्हावा यासाठी वाढीव वेळा आणि अतिरिक्त सेवा देत एमएमआरडीएकडून सुरळीत प्रवासाची खात्री

## गणेशोत्सवादरम्यान मेट्रो २ए आणि ७ या मार्गिकांवरील गाड्या मध्यरात्रीपर्यंत धावणार, प्रवाशांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान विशेष वेळापत्रक

**मुंबई, २३ ऑगस्ट २०२५:**
सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री व एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली, तसेच महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली, एमएमआरडीएकडून घोषणा करण्यात आली आहे की, अंधेरी पश्चिम (२ए मार्गिका) आणि गुंदवली (७ मार्गिका) या दोन्ही टर्मिनल स्थानकांवरून शेवटच्या गाड्या आता रात्री **११:००** ऐवजी मध्यरात्री **१२:००** वाजेपर्यंत करण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर, २०२५ या ११ दिवसांमध्ये ही विशेष सेवा उपलब्ध असेल.

मुंबईत साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाचा भाविकांना पुरेपूर आनंद घेता यावा यासाठी मेट्रोने विशेष सेवा देऊ केली आहे. गणेशोत्सवादरम्यान मुंबईच्या विविध भागांमध्ये असलेल्या गणेश मंडळांना लाखो भाविक भेट देत असतात. हे लक्षात घेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) २ए व ७ या मार्गिकांवर विस्तारित सेवा सुरू करण्यात येणार आहेत, जेणेकरून प्रवाशांना या सणासुदीच्या काळात सुरक्षित, सुरळीत आणि विश्वासार्हतेने रात्री उशीरापर्यंत प्रवास करता येऊ शकेल.

**ट्रेनच्या कामकाजाच्या वेळा**

**आठवड्याच्या कामकाजाच्या दिवशी (सोमवार—शुक्रवार):**

• एकूण ३१७ फेऱ्या (या आधीच्या ३०५ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)
• गर्दीच्या वेळेत: दर ५ मिनिटे ५० सेकंदांनी एक गाडी
• गर्दी नसलेल्या वेळेत: दर ९ मिनिटे ३० सेकंदांनी एक गाडी

**शनिवारी**
• एकूण २५६ फेऱ्या (या आधीच्या २४४ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)
• गर्दीच्या वेळेत: दर ८ मिनिटे ६ सेकंदांनी एक गाडी
• गर्दी नसलेल्या वेळेत: दर १० मिनिटे २५ सेकंदांनी एक गाडी

**रविवारी**
• एकूण २२९ फेऱ्या (या आधीच्या २१७ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)
• दर १० मिनिटांनी एक गाडी
• प्रवाशांच्या मागणीनुसार आवश्यक असल्यास अतिरिक्त फेऱ्या चालवण्यात येतील.

**गणेशोत्सवादरम्यान सुलभ प्रवासासाठी**
गणेशोत्सवादरम्यान मुंबईतील गणेश मंडळांना भेट देणाऱ्या आणि गणपतीचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने प्रवास करणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरळीतपणे व्हावा यासाठी या वाढीव फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. विश्वासार्ह आणि कार्यक्षम मेट्रो सेवेच्या माध्यमातून प्रवाशांचा अनुभव अधिक सुलभ करत शहराच्या सांस्कृतिक परंपरा जतन करण्यासाठी एमएमआरडीए कायम वचनबद्ध आहे.

महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले:
**"गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. गणेशोत्सवाच्या ११ दिवसांत लाखो भक्त विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी मुंबईत प्रवास करतात. त्यांना मध्यरात्रीपर्यंत सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससुविधा मिळणे ही आमची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारच्या वातावरणात प्रवास करण्यासाठी मेट्रो ही भक्तांसाठी अधिक विश्वासार्ह परिवहन सेवा आहे. म्हणूनच दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर, या कालावधीत मेट्रो २ए आणि ७ या मार्गिकांवरील गाड्या मध्यरात्रीपर्यंत चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे गणेशभक्तांना शहरभरातील मंडळांमध्ये अधिक सोयीस्करपणे जाता येईल, त्याचप्रमाणे मुंबई वन साठी जागतिक दर्जाची वाहतूक यंत्रणा उभारण्याची आमची बांधिलकी या उपक्रमातून दिसून येते, जी सुरक्षित, कार्यक्षम आणि लोकाभिमुख असेल."**

महाराष्ट्राचे सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे म्हणाले:

**“गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा अभिमान आहे आणि प्रत्येक मुंबईकराच्या मनात गणेशोत्सवाचे विशेष स्थान आहे. या काळात लाखो भक्त शहरभर फिरून उत्सवात सहभागी होतात आणि त्यांचा प्रवास सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायी होणे ही सरकार म्हणून आमची जबाबदारी आहे. मेट्रो सेवा मध्यरात्रीपर्यंत वाढवून आणि संचालन अधिक सक्षम करून नागरिकांना प्रवासाची चिंता न करता उत्सवाचा आनंद घेता येईल, याची एमएमआरडीएने खातरजमा केली आहे. सांस्कृतिक परंपरा जपत मुंबईकरांना आधुनिक, जागतिक दर्जाच्या वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.”**

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी (भा. प्र. से.) म्हणाले:
**“गणेशोत्सव हा मुंबईत सर्वात मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येणारा उत्सव आहे. लाखो भक्त विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी उशिरापर्यंत प्रवास करतात. त्यांच्या सोयीसाठी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत मेट्रो २ए आणि ७ या मार्गिकांवरील फेऱ्या नेहमीप्रमाणे रात्री ११ वाजेपर्यंत न धावता मध्यरात्री १२ वाजेपर्यंत धावतील. या काळात आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी गर्दीच्या वेळेत गाड्यांची वारंवारता अधिक असेल, तर रविवारी दर १० मिनिटांनी गाडी उपलब्ध असेल. यामुळे प्रवास सर्वांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि सोयीस्कर होईल. ‘मुंबई इन मिनिट्स’ या आमच्या व्हिजनशी सुसंगत असलेल्या या उपक्रमामुळे देशांतर्गत तसेच परदेशी पर्यटकांनाही त्यांच्या आवडत्या गणेश मंडळांपर्यंत काही मिनिटांत पोहोचण्याची सुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे या उत्सवादरम्यानचा त्यांचा प्रवास अधिक सुकर आणि आनंददायी होईल.”**

एमएमएमओसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका, श्रीमती रुबल अगरवाल (भा. प्र. से.) म्हणाल्या:
**“गणेशोत्सवाच्या काळात लाखो लोक बाहेर पडतात आणि त्यांचा प्रवास सुरळीत व तणावरहित व्हावा, हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. म्हणूनच मेट्रो २ए आणि ७ या मार्गिकांवरील शेवटच्या फेऱ्या मध्यरात्रीपर्यंत वाढवण्यात आल्या असून, आठवड्याच्या कामकाजाच्या दिवशी गर्दीच्या वेळेत गाड्यांची वारंवारता वाढवली आहे, तर रविवारी दर १० मिनिटांनी गाडी उपलब्ध असेल. यामुळे उत्सवाच्या गर्दीचे व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे होईल आणि नागरिकांना वाहतूककोंडीत न अडकता त्यांच्या आवडत्या मंडळांच्या गणपतींचे दर्शन घेण्यासाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय मिळेल.”**

---

## गणेश उत्सव के दौरान यात्रा होगी सुगम: एमएमआरडीए ने बढ़ाया समय और सेवाएं

## गणेश उत्सव के दौरान बढ़ती यात्रियों की संख्या को देखते हुए मेट्रो लाइन्स २ए और ७ पर २७ अगस्त से ६ सितंबर २०२५ तक विशेष टाइमटेबल लागू रहेगा और सेवाएं रात १२ बजे तक संचालित की जाएंगी।

**मुंबई, २३ अगस्त २०२५:**
माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस और माननीय उपमुख्यमंत्री एवं एमएमआरडीए अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे के दूरदर्शी नेतृत्व में, तथा महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी (आईएएस) के मार्गदर्शन में, एमएमआरडीए ने घोषणा की है कि मेट्रो लाइन २ए (अंधेरी वेस्ट) और लाइन ७ (गुंदवली) से अब अंतिम मेट्रो सेवाएं रात **१२:००** बजे (००:०० बजे) रवाना होंगी, जो पहले रात **११:००** बजे (२३:०० बजे) तक ही उपलब्ध थीं। यह विशेष व्यवस्था गणेश उत्सव के दौरान यात्रियों की बढ़ती संख्या को ध्यान में रखते हुए २७ अगस्त से ६ सितंबर २०२५ तक, कुल ११ दिनों तक लागू रहेगी।
इस गणेश उत्सव में मुंबईकर बिना किसी चिंता के मेट्रो से आसानी से पंडालों तक पहुंच सकेंगे। शहर भर में लाखों भक्तों की आवाजाही को ध्यान में रखते हुए, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने मेट्रो लाइन्स २ए और ७ पर सेवाएं देर रात तक बढ़ा दी हैं, जिससे यात्रियों को पूरे त्योहार के दौरान सुरक्षित, सुविधाजनक और भरोसेमंद सफर मिल सके।

**ट्रेन संचालन योजना**
**सप्ताह के कार्यदिवसों (सोमवार से शुक्रवार) पर:**
- कुल ३१७ सेवाएं (पहले की ३०५ सेवाओं में १२ की बढ़ोतरी)
- पीक आवर्स में हर ५ मिनट ५० सेकंड पर एक ट्रेन
- नॉन-पीक आवर्स में हर ९ मिनट ३० सेकंड पर एक ट्रेन

**शनिवार को:**
- कुल २५६ सेवाएं (पहले की २४४ सेवाओं में १२ की बढ़ोतरी)
- पीक आवर्स में हर ८ मिनट ६ सेकंड पर एक ट्रेन
- नॉन-पीक आवर्स में हर १० मिनट २५ सेकंड पर एक ट्रेन

**रविवार को:**
- कुल २२९ सेवाएं (पहले की २१७ सेवाओं में १२ की बढ़ोतरी)

- पूरे दिन हर १० मिनट पर एक ट्रेन
- यात्रियों की मांग बढ़ने पर अतिरिक्त ट्रेनें चलाई जाएंगी।

**गणेश उत्सव के दौरान यात्रियों की सुविधा**

इन अतिरिक्त मेट्रो सेवाओं का उद्देश्य शहर भर में पंडालों के दर्शन और उत्सवों में भाग लेने वाले लाखों मुंबईकरों को निर्बाध कनेक्टिविटी प्रदान करना है। एमएमआरडीए शहर की सांस्कृतिक परंपराओं को सम्मान देते हुए यात्रियों को विश्वसनीय और कुशल मेट्रो सेवाओं के माध्यम से बेहतर यात्रा अनुभव देने के लिए प्रतिबद्ध है।

महाराष्ट्र के माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस ने कहा:

**"गणेश उत्सव महाराष्ट्र की रुह है, और इन ११ दिनों में लाखों श्रद्धालु पूरे मुंबई में घूमकर गणपती के दर्शन करते हैं और आशीर्वाद लेते हैं। ऐसे में यह हमारी जिम्मेदारी है कि उन्हें रात १२ बजे तक सुरक्षित और भरोसेमंद परिवहन सुविधा मिले। मेट्रो हर मौसम में श्रद्धालुओं के लिए एक अधिक भरोसेमंद यात्रा विकल्प है। इसी कारण २७ अगस्त से ६ सितंबर तक मेट्रो लाइन्स २ए और ७ की आखिरी सेवा को मध्यरात्रि तक बढ़ाने का निर्णय लिया गया है। यह पहल न सिर्फ श्रद्धालुओं को शहर भर के पंडालों तक पहुंचने में अधिक सुविधा देगी, बल्कि मुंबई के लिए एक सुरक्षित, कुशल और लोगों को केंद्र में रखकर तैयार किया गया आधुनिक, विश्वस्तरीय ट्रांसपोर्ट सिस्टम विकसित करने के हमारे विज़न को भी दर्शाती है।"**

महाराष्ट्र के माननीय उपमुख्यमंत्री एवं एमएमआरडीए के अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे ने कहा:

**"गणेश उत्सव महाराष्ट्र का गर्व है और हर मुंबईकर के दिल में इसका एक खास स्थान है। इन दिनों लाखों श्रद्धालु पूरे शहर में घूमकर उत्सवों में भाग लेते हैं, और एक सरकार के तौर पर यह हमारा कर्तव्य है कि उनकी यात्रा सुरक्षित, सुगम और आरामदायक हो। मेट्रो सेवाएं रात १२ बजे तक बढ़ाकर और संचालन को मजबूत बनाकर एमएमआरडीए यह सुनिश्चित कर रहा है कि लोग बिना किसी यात्रा की चिंता के पूरे मन से उत्सव में शामिल हो सकें। हम सांस्कृतिक परंपराओं को सहेजने और मुंबई के नागरिकों को आधुनिक, विश्वस्तरीय परिवहन सुविधाएं देने के लिए प्रतिबद्ध हैं।"**

एमएमआरडीए के महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी(आईएएस) ने कहा:

**"गणेश उत्सव मुंबई की सांस्कृतिक पहचान का एक अहम हिस्सा है, जिसमें लाखों श्रद्धालु देर रात तक गणपती के दर्शन के लिए यात्रा करते हैं। श्रद्धालुओं की सुविधा को ध्यान में रखते हुए, २७ अगस्त से ६ सितंबर तक मेट्रो लाइन्स २ए और ७ की सेवाएं रात १२ बजे तक उपलब्ध रहेंगी, जो सामान्यतः रात ११ बजे तक ही चलती हैं। इस अवधि में सप्ताह के कार्यदिवसों में पीक आवर्स के**

**दौरान ट्रेनें अधिक अंतराल पर चलेंगी और रविवार को हर १० मिनट में एक सेवा उपलब्ध रहेगी, जिससे यात्रियों को सुरक्षित, सुविधाजनक और भरोसेमंद यात्रा का अनुभव मिलेगा। 'मुंबई इन मिनिट्स' के विज़न के अनुरूप यह पहल श्रद्धालुओं को, चाहे वे देश के हों या विदेश से आए हों, ट्रैफिक से बचाकर उनके पसंदीदा पंडालों तक तेज़ और आरामदायक ढंग से पहुंचाने में मदद करेगी, जिससे उनका उत्सव और भी सहज और आनंदमय हो सके।"**

एमएमएमओसीएल की प्रबंध संचालिका श्रीमती रूबल अग्रवाल (आईएएस) ने कहा:

**"गणेश उत्सव के दौरान लाखों लोग सड़कों पर निकलते हैं, और हम यह सुनिश्चित करना चाहते हैं कि उनकी यात्रा सुगम और तनावमुक्त हो। इसी उद्देश्य से मेट्रो लाइन्स २ए और ७ की अंतिम सेवा को रात १२ बजे तक बढ़ाया गया है, साथ ही सप्ताह के कार्यदिवसों में पीक आवर्स में ट्रेन की आवृत्ति बढ़ाई गई है और रविवार को हर १० मिनट पर ट्रेन उपलब्ध रहेगी। इससे त्योहार के दौरान बढ़ने वाली भीड़ को बेहतर तरीके से संभालने में मदद मिलेगी और नागरिकों को ट्रैफिक में फंसे बिना अपने पसंदीदा पंडालों तक पहुंचने के लिए एक सुरक्षित, भरोसेमंद और सुविधाजनक विकल्प मिलेगा।"**

---




SUFI


FOULING MARK



